मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरात 15 ठिकाणी मूर्ती विघटन केंद्र!

## महापालिका प्रशासनाची तयारी : पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणार!

**पिंपरी | प्रतिनिधी**

यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक वातावरणात पार पाडण्यासाठी शहरात पहिल्यांदाच मुर्ती विघटन केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महापालिकेने हा पुढाकार घेतला असून क्षेत्रीय कार्यालयनिहाय ४० फूट बाय ३० फूट आकाराची आणि ५ फूट खोल अशी एकूण १५ भव्य विघटन केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. या विघटन केंद्रांवर पहिल्यांदाच गणेशमूर्तींचे रासायनिक प्रक्रियेद्वारे शास्त्रोक्त पद्धतीने विघटन करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. तसेच नदी व तलावांचे प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी मुर्ती संकलन केंद्रांमध्ये गणेशमूर्तींचे दान करून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहनही आयुक्त सिंह यांनी केले आहे.



पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची स्थापना करण्याबाबत तसेच शहरातील नदी व तलावांचे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी महापालिकेच्या मुर्ती संकलन केंद्रावर मुर्ती दान करण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. तसेच संकलन केंद्रांवर प्राप्त झालेल्या मुर्तींचे शास्त्रोक्त पद्धतीने विघटन करण्यासाठी राष्ट्रीय केमिकल अ‍ॅड फर्टिलायझर लिमिटेड या संस्थेमार्फत अमोनियम बाय कार्बोनेट हे रसायन उपलब्ध करून घेण्यात आले आहे. हे रसायन योग्य प्रमाणात वापरण्याबाबत पर्यावरण विभागामार्फत क्षेत्रीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यानंतर संकलन केंद्रांवर प्राप्त मूर्तींचे कृत्रिम तलावांमध्ये विघटन करण्यात येणार आहे. पर्यावरण विभाग व क्षेत्रीय कार्यालय यांच्या समन्वयाने विघटन केंद्र प्रक्रिया होणार आहे.

### गणेशमुर्ती विघटन केंद्रांची ठिकाणे

» अ क्षेत्रीय कार्यालय –
१) नियोजित महापौर निवास, से. नं.२४, निगडी प्राधिकरण,
२) मोहननगर सांस्कृतिक भवन
» ब क्षेत्रीय कार्यालय –
१) सर्व्हे नं. ९४, म्हस्के वस्ती रोड, रावेत, सागर मेडिकलजवळ
२) केशवनगर जुनी शाळा पटांगण, चिंचवड
» क क्षेत्रीय कार्यालय –
१) एच. ए. मैदान, नेहरुनगर, पिंपरी
» ड क्षेत्रीय कार्यालय –
१) कोहिनुर सफायर समोर, ताथवडे
२) शिल्पा हॉटेल शेजारी, डी पी रोड पिंपळे निलख
» ई क्षेत्रीय कार्यालय –
१) डोळस मैदान, दिघी
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान समोरील मैदान
» फ क्षेत्रीय कार्यालय –
१) टाऊन हॉल, घरकुल, चिखली
२) टाऊन हॉल, सोनवणे वस्ती, चिखली
» ग क्षेत्रीय कार्यालय –
१) वैभव नगर, पिंपरी
२) राघवेंद्र स्वामी मठासमोर, मनपा आरक्षित जागा, थेरगाव
»ह क्षेत्रीय कार्यालय- १) एच. ए. ग्राऊंड, संत तुकाराम नगर

# पवना धरण 100 टक्के भरले, 4320 क्युसेक्सने विसर्ग सुरु

## नागरीकांना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पवना धरण सद्यस्थितीत १०० टक्के भरलेले असून धरणाच्या सांडव्यावरून २२२० क्युसेक्सने विसर्ग नदीपात्रामध्ये सुरु होता. रात्री ९ वाजल्यानंतर त्यात वाढ करण्यात आली असून विसर्ग ४३२० क्युसेक्स इतका करण्यात आला आहे. त्यामुळे पवना नदी काठच्या नागरीकांना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



पाणलोट क्षेत्रामधील पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानुसार धरणातील पाणीसाठा नियंत्रित करणेकरिता रात्री ९ वाजल्यापासून सांडव्याद्वारे विसर्ग वाढवून ४३२० क्युसेक्स क्षमतेने नदीपात्रात विसर्ग करण्यात आला आहे. सांडव्यावरील विसर्ग वाढवल्यानंतर नदीपात्रामध्ये एकूण ४३२० क्यूसेक्स इतका विसर्ग नदीपात्रामध्ये होणार आहे.

पाणलोट क्षेत्रात होणा-या पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानुसार धरणातून नदीपात्रात होणारा विसर्ग पुन्हा कमी/जास्त करण्यात येईल. नदीपात्रात कोणीही उतरू नये. नदी मधील पाण्याचे पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत. सखल भागातील सर्व नागरिकांना सूचना देण्यात याव्यात, सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घेत जलसंपदा विभागास/प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गणेशोत्सवात मेट्रो मध्यरात्रीपर्यंत सुरु राहणार; मेट्रो फेऱ्यांच्या संख्येतही वाढ

## भाजपा आमदार महेश लांडगे यांनी साधला नागरिकांशी संवाद, आंद्रा भामा आसखेडचा दुसरा टप्पा जून-2025 पर्यंत पूर्ण होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या काळात गणेश मंडळांचे देखावे बघण्यासाठी नागरिक मोठ्याप्रमाणावर शहराच्या मध्य भागात येत असतात. नागरिकांच्या सुविधेसाठी गणेशोत्सव काळात मेट्रोच्या वेळात बदल करून मेट्रोची प्रवासी सेवा मध्यरात्रीपर्यंत चालवण्यात येणार आहे. तसेच मेट्रो फेऱ्यांच्या संख्येतही वाढ करण्यात येणार आहे.



अनंत चतुर्दशीच्या दिवशी दिनांक १७/०९/२०२४ ते १८/०९/२०२४ सकाळी ६ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ६ पर्यंत असे २४ तास मेट्रो सेवा अखंड सुरु असणार आहे. दिनांक ७/८/२०२४ ते ९/८/२०२४ या दोन दिवसात मेट्रो सकाळी ६ ते रात्री ११ पर्यंत सुरु असेल. दिनांक १०/८/२०२४ ते १६/८/२०२४ या दिवसात मेट्रो सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत सुरु असेल.

दिनांक १८/०९/२०२४ रोजी मेट्रो सेवा सकाळी ६ ते रात्री १० अशी नियमित सुरु असणार आहे. म्हणजे दिनांक १७/०९/२०२४ सकाळी ६ ते १८/०९/२०२४ रात्री १० अशी मेट्रो सेवा अखंड ४० तास सुरु राहणार असल्याची माहिती मेट्रो प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

| दिनांक | प्रवासी सेवेची वेळ | एकूण वेळ |
|---|---|---|
| ७/८/२४ ते ९/८/२४ | सकाळी ६ ते रात्री ११ पर्यंत | १७ |
| १०/८/२४ ते १६/८/२४ | सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत | १८ |
| १७/०९/२४ ते १८/०९/२४ | सकाळी ६ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ६ पर्यंत | २४ |

# शहरातील पूरस्थितीला पालिकाच जबाबदार

## पर्यावरणतज्ज्ञांचा आरोप, नदीपात्रातील पूररेषेत बांधकामांना परवानगी दिल्याने किरकोळ पावसानंतर पूर

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने शहरातील पूरस्थितीचे नेमके कारण शोधण्यासाठी समिती नेमली असून आठ दिवसांची मुदत संपल्यावरही त्यांनी अहवाल सादर केलेला नाही. पूरस्थितीला पुणे महापालिकाच जबाबदार असल्याने त्यांच्या अहवालातून सत्य कधीही बाहेर येणार नाही, असा आरोप पर्यावरण तज्ज्ञांनी 'सीविक मिरर'शी बोलताना केला आहे. नदीपात्रातील निळ्या पूररेषेच्या आत बांधकामास परवानगी दिल्याने पूर येत असल्याचा दावाही त्यांनी केला.

प्रतिक्रिया देत त्यांनी महापालिकेलाच जबाबदार धरले आहे. पालिकेच्या समितीमध्ये पथ बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता साहेबराव दांडगे, कार्यकारी अभियंता बिपीन शिंदे, ड्रेनेज विभागाचे दिनकर गोजारे आणि आमंत्रित सदस्य म्हणून जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता सुनंदा जगताप यांचा समावेश केला आहे. समितीने अहवाल तयार करण्यासाठी महिनाभराचा कालावधी घेतला आहे. परंतु अद्याप अहवाल सादर झाला नाही. काही अधिकाऱ्यांनी अहवाल सादर केला आहे, पण आयुक्तांना मिळाला नसल्याचे सांगितले. त्यामुळे हा अहवाल जनतेसाठी खुला होणार की नेहमीप्रमाणे तो गुलदस्तातच राहणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

जलसंपदा विभागाने २०११ मध्ये मुठा नदीची पूररेषा तयार केली होती. गेल्या काही वर्षांत पूररेषेच्या आत भराव टाकण्यासह अनधिकृत बांधकामांमुळे नदीचे पात्र अरुंद झाले आहे. महापालिकेने २०१३ ते २०१७ मध्ये तयार केलेल्या शहर विकास आराखड्यात नदीची पूररेषा बदलल्याचा आरोप पर्यावरण तज्ज्ञांनी केला आहे. तसेच २०१६ पासून शहरात खोट्या पूररेषा चिन्हांकित करून अनेक बांधकामांना परवानगी देण्यात आली आहे. नदी सुधार प्रकल्प आणि मेट्रो प्रकल्पाच्या माध्यमातून नदी लहान करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप पर्यावरणतज्ज्ञ सारंग यादवाडकर यांनी केला आहे.

शहरात चहूबाजूंनी सिमेंट कॉंक्रिटीकरण आणि डांबरीकरण केले जात आहे. डोळ्यांना चिमूटभर माती दिसत नाही. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरणार कसे हा प्रश्न आहे. पंधरा मिनिटे ते अर्धा तास पाऊस पडल्यावरही शहरात मोठ्या प्रमाणात पाणी साचते. यापूर्वी ढगफुटीसारख्या पावसात पुणेकरांना असे अनुभव यायचे. मात्र, गेल्या दोन-तीन वर्षांत पूरसदृश परिस्थिती सातत्याने अनुभवायला मिळत आहे. गेल्या आठवड्यातील मुसळधार पावसाने आणि खडकवासला धरणातून विसर्ग झाल्याने शहरातील अनेक भागात पाणी साचले होते. त्यामुळे आता शहरातील नद्यांच्या पूररेषा नव्याने आखण्याची गरज आहे.



### नदीपात्रात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण

**» नदीपात्रात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे स्पष्ट होत आहे. महापालिकेची चूक असल्याने कोणताही अहवाल पुढे येणार नाही. कारण त्यातून पालिकेचीच चूक पुढे येणार आहे. महापालिकेवर नदीपात्राची संरक्षित करण्याची जबाबदारी होती. मात्र त्यात महापालिकेला अपयश आले आहे. नदीपात्र अरुंद होत असल्याने पाण्याचा फुगवटा होत असल्याने पूर परिस्थिती निर्माण होत आहे, असेही त्यांनी सांगितले. याबाबत महापालिकेच्या बांधकाम विभागाशी संपर्क साधला असात कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.**

### पूररेषेचा पुन्हा अभ्यास करण्याची मागणी

**»पर्यावरणतज्ज्ञ सारंग यादवाडकर, विवेक वेलणकर आणि विजय कुंभार यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून पुणेकरांच्या सुरक्षेसाठी पूररेषेचा पुन्हा अभ्यास करण्याची मागणी केली आहे. यावर २६ जून रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने २ आठवड्यांच्या आत जलसंपदा विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करून अहवाल तयार करून रस्ता तयार करावा, असे आदेश दिले होते. त्यानुसार समितीने पूररेषेचा अभ्यास सुरू केला आहे,**

### महापालिकेने पूररेषेकडे दुर्लक्ष

**»पिंपरी-चिंचवड महापालिकेने पूररेषेकडे दुर्लक्ष करून अनेक बांधकामांना परवानगी दिली आहे. अशा इमारतींना परवानगी मिळविण्यासाठी शर्यत लागली आहे. त्यामुळे नदीतून जाणाऱ्या पाण्याचा प्रवाह विस्कळीत झाला आहे. सारंग यादवाडकर म्हणाले की, '१९९७ मध्ये खडकवासला धरणातून ९० हजार क्युसेक वेगाने पाणी मुठा नदीत सोडण्यात आले होते. त्यावेळी शहराच्या कोणत्याही भागात पाणी शिरले नव्हते. परंतु, २०११ मध्ये ६५ हजार क्युसेक पाणी सोडण्यात आल्याने नदीचे पाणी शहरातील काही भागांत शिरले.**

# पुणे पोर्शे कार अपघात प्रकरणात आमदार सुनील टिंगरे यांचीदेखील पोलीस चौकशी

## प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे संबंध ,तक्रारी आल्या त्या सर्वांची चौकशी करण्यात आली : अमितेश कुमार

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्याच्या पोर्शे कार अपघात प्रकरणी एक मोठी बातमी समोर येत आहे. पोर्शे कार अपघात प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील टिंगरे यांचीदेखील चौकशी झाल्याची माहिती समोर येत आहे. पुण्याते पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्वत: याबाबत कबुली दिली आहे. पोर्शे केस प्रकरणात ज्यांचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे संबंध आले किंवा संबंध असल्याच्या तक्रारी आल्या त्यांच्या सर्वांची चौकशी करण्यात आली, असं पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितलं.

पुण्यात कल्याणी नगर परिसरात एका नामांकीत उद्योजकाच्या मुलाने भरधाव गाडी चालवत दोन जणांना उडवलं होतं. या अपघात बाईकवर असलेले तरुण आणि तरुणी यांचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेनंतर रस्त्यावरच्या नागरिकांनी कारमधील मुलांना मारझोड केली होती. यावेळी अपघात ठिकाणी आमदार सुनील टिंगरे गेले होते. एवढंच नाही तर सुनीट टिंगरे येरवाडा पोलीस ठाण्यातही गेले होते. त्यामुळे सुनील टिंगरे यांनी अल्पवयीन आरोपीला मदत केल्याचा आरोप केला जात होता.



सुनील टिंगरे यांनी संबंधित आरोप फेटाळले होते. तसेच त्यांनी फेसबुकवर सविस्तर पोस्ट शेअर करत भूमिका मांडली होती. या प्रकरणी आता पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सुनील टिंगरे यांचीदेखील चौकशी झाल्याचं सांगितलं आहे. सुनील टिंगरे पोलीस ठाण्यात गेले तेव्हा त्यांनी पोलिसांवर दबाव आणला किंवा नाही हे आताच सांगणं योग्य होणार नाही, असं पोलीस आयुक्त म्हणाले.

पोर्शे अपघात प्रकरणावरुन पुणे पोलिसांवर सडकून टीका झाली होती. संबंधित घटना ही साडेतीन महिन्यांपूर्वी घडली होती. या घटनेनंतर पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्न उपस्थित करण्यात येत होते. पण पुणे पोलिसांनी या प्रकरणी नंतर जो तपास केला तेव्हा त्यामध्ये अनेक खुलासे झाले. अल्पवयीन मुलाच्या ब्लड टेस्टमध्ये फेरफार करण्यात आल्याची माहिती समोर आली होती. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित रुग्णालयातील अधिकाऱ्यांनादेखील अटक केली होती. तसेच अल्पवयीन मुलाच्या आई-वडिलांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणी अटकेतील आरोपींना अजूनही जामीन मिळालेला नाही. पोलीस या प्रकरणी सखोल तपास करत आहेत.

# गुन्हेगारांच्या बेकायदा घरावर बुलडोझर

## आयुक्त अमितेश कुमार; माहिती संकलित करण्यास सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

गुन्हेगारांनी आपली घरे जर बेकायदा पद्धतीने उभारली असतील, तर त्यावर आता बुलडोझर चालणार आहे. पोलिसांनी याबाबत माहिती संकलित करण्यास सुरुवात केली आहे.

नियमांच्या चौकटीत राहून महापालिकेच्या मदतीने हे काम करण्यात येणार आहे, असा इशाराच पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुन्हेगारांना दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या खुनामुळे शहरातील वाढती गुन्हेगारी आणि टोळ्यातील संघर्ष पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

वनराज यांच्या खुनात सहभागी असलेल्या प्रमुख आरोपींचे गुन्हेगारी रेकॉर्ड आहे. त्या पार्श्वभूमीवर आता पोलिसांनी या गुन्हेगारांना चांगलीच अद्दल घडविण्यासाठी त्यांच्या बेकायदा घरावर बुलडोझर फिरविण्याची तयारी केली आहे.



पोलिसांनी सराईत गुन्हेगारांच्या बेकायदा घरांची, मालमत्तेची माहिती घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामध्ये काही आरोपी फ्लॅटमध्ये राहात आहेत, तर काही आरोपींची घरे भाड्याची आहेत.

त्यांच्या घरांची मालकी तपासली जात असून, त्यामध्ये जर ही घरे सरकारी जागेवर अतिक्रमण करून उभारली असतील, कोणाच्या मालमत्तेत अवैध ताबा मारून बांधली असतील, तर त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

आतापर्यंत आंदेकर खून प्रकरणात पोलिसांनी एकूण १५ जणांना अटक केली आहे, तर तीन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. आणखी काही संशयित आरोपी पोलिसांच्या रडावर आहेत.

# ड्रोनद्वारे 95 टक्के मालमत्ता सर्वेक्षण पूर्ण

## अडीच लाख नवीन मालमत्ता कर आकारणी कक्षेत : शहरातील मालमत्ता पोहचणार पावणे नऊ लाखांवर

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या माध्यमातून अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने मालमत्ता सर्वेक्षण सुरू असून ९५ टक्के सर्वेक्षण पुर्ण झाले आहे. या सर्व मालमत्तांना युपीक आयडी क्रमांक टाकून झाले आहेत. १४८ पैकी आता केवळ ८ गटातील काम बाकी आहे. आत्तापर्यंतच्या सर्वेक्षणात तब्बल २ लाख ५४ हजार नवीन मालमत्ता आढळल्या आहेत. सध्याच्या आणि सर्वेक्षणात आढळलेल्या नवीन अशा सुमारे पावणेनऊ लाख मालमत्ता नोंदणीकृत होणार आहेत.



### कर आकारणीचे तीन टप्पे

» महापालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणात आत्तापर्यंत २ लाख ५४ हजार नवीन मालमत्ता सापडल्या आहेत. यामधील सुमारे ५७ हजार मालमत्ता धारकांच्या हरकती, सुचना, तक्रारीची सुनावणी प्रक्रिया चालू झाली आहे. त्यामुळे अशा मालमत्ताधारकांना कर आकारणी संदर्भातील पहिली नोटीस देण्यात येत असून त्याचे वाटप सुरू आहे. या मालमत्ता धारकांकडे चालू मागणी ५५ कोटी तर थकीत मागणी ८५ कोटी अशी १४० कोटींचा कराची रक्कम येणार आहे. नव्याने आढळलेल्या मालमत्तांपैकी प्रत्यक्षात बील तयार झालेल्या मालमत्तांची संख्या १४ हजार ५०० आहे. या मालमत्ता धारकांकडे एकूण ३० कोटी ८४ लाख रुपये येणे अपेक्षित आहे. त्यापैकी ३ कोटी रूपयांचा स्कॅनकोडच्या आधारे महापालिका तिजोरीत भरणा झाला आहे. नव्याने आढळलेल्या, वाढीव बांधकाम आणि वापरात बदल अशा मालमत्ता धारकांसाठी शहरातील महत्वाच्या सात ठिकाणी सुनावणी केंद्र सुरू करण्यात आली आहेत. क्षेत्रफळात फरक, वापरात बदल अशा करपात्र मुल्यावर परिणाम करणा-या ज्या बाबी आहेत. त्यासाठी सविस्तर सुनावणी घेण्यात येत आहे.

शहरात कर आकारणी व कर संकलन विभागाचे १८ झोन आहेत. यामध्ये १४८ गटापैकी १४० गटातील ८ लाख ४७ हजार ४८७ मालमत्तांना नंबर टाकून पूर्ण झाले आहेत. ८ गटातील मालमत्तांना नंबर टाकण्याचे काम सुरू आहे. सध्यस्थितीत ६ लाख ३५ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यापैकी ५ लाख ७७ हजार ७८४ मालमत्तांचे जिओ सिक्वेसिंग झाले आहे. जुन्या आणि नवीन अशा ६० हजार मालमत्तांना नंबर टाकणे बाकी आहे. नोंदणीकृत नसलेल्या मात्र नंबर टाकून झालेल्या २ लाख ५४ हजार मालमत्ता आहेत. त्यामुळे शहरात सध्यस्थितीत ८ लाख ४७ हजार ४८७ मालमत्ता होत आहेत. नंबर टाकून झालेल्या मालमत्तांपैकी ५ लाख ३ हजार ४१ मालमत्तांचे अंतर्गत मोजमाप झाले आहे.

### ५७ हजार मालमत्तांना कर वसुलीची पहिली नोटीस

महापालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणात आत्तापर्यंत २ लाख ५४ हजार नवीन मालमत्ता सापडल्या आहेत. यामधील सुमारे ५७ हजार मालमत्ता धारकांच्या हरकती, सुचना, तक्रारीची सुनावणी प्रक्रिया चालू झाली आहे. त्यामुळे अशा मालमत्ताधारकांना कर आकारणी संदर्भातील पहिली नोटीस देण्यात येत असून त्याचे वाटप सुरू आहे. या मालमत्ता धारकांकडे चालू मागणी ५५ कोटी तर थकीत मागणी ८५ कोटी अशी १४० कोटींचा कराची रक्कम येणार आहे. नव्याने आढळलेल्या मालमत्तांपैकी प्रत्यक्षात बील तयार झालेल्या मालमत्तांची संख्या १४ हजार ५०० आहे. या मालमत्ता धारकांकडे एकूण ३० कोटी ८४ लाख रुपये येणे अपेक्षित आहे. त्यापैकी ३ कोटी रूपयांचा स्कॅनकोडच्या आधारे महापालिका तिजोरीत भरणा झाला आहे. नव्याने आढळलेल्या, वाढीव बांधकाम आणि वापरात बदल अशा मालमत्ता धारकांसाठी शहरातील महत्वाच्या सात ठिकाणी सुनावणी केंद्र सुरू करण्यात आली आहेत. क्षेत्रफळात फरक, वापरात बदल अशा करपात्र मुल्यावर परिणाम करणा-या ज्या बाबी आहेत. त्यासाठी सविस्तर सुनावणी घेण्यात येत आहे.

# पुररेषेतील अनधिकृत बांधकामाचा सर्व्हे संपेना

## आठ दिवसांच्या सर्वेक्षणाला लागले दोन आठवडे : 60 टक्के सर्व्हेक्षण पूर्ण झाल्याचा अधिकाऱ्यांचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील पवना, मुळा, इंद्रायणी नद्यांच्या पूररेषेत बांधकामे उभारल्याने थोड्या पावसानेही पूर येत आहे. त्यामुळे पूररेषेतील अनधिकृत बांधकामे पाडण्यात येणार असून निळ्या पूररेषेतील बांधकामांचे येत्या आठ दिवसांत सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्तांनी सांगितले होते. मात्र, दोन आठवडे उलटून गेले तरीही फक्त सर्व्हेक्षण सुरूच आहे. तर ६० टक्के सर्व्हेक्षण झाल्याचे अधिकारी सांगत आहेत.



> अनधिकृत बांधकामे पाडण्याच्या विषयावर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात नियोजन बैठक पण झाली आहे. पुराच्या पार्श्वभूमीवर नदीपात्रातील निळ्या पूररेषेतील सर्व बांधकामे पाडण्याचे नियोजन निश्चित करण्यात आले. ६० टक्के सर्व्हेक्षण झाले असून लवकरच कारवाईला सुरूवात करण्यात येणार आहे.
>
> **- मनोज लोणकर, उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

शहरात लोकसंख्या वाढ होऊ लागल्याने अनेक भागांत पुनर्विकास होत आहे. चाळी, बैठी घरे, झोपडपट्टी, बंगले तोडून टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. परंतु, त्या भागातील ड्रेनेजलाइन जुन्या व कमी क्षमतेच्या असल्याने सांडपाणी तिपटीने वाढून त्या वारंवार तुंबत आहेत. नदीपात्रातील पूररेषेत बांधकामे वाढल्याने पूरस्थिती उद्भवत आहे, असे सांगत सर्व्हेक्षण करून कारवाई करण्यात येणार असल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले होते. मात्र, दोन आठवड्यानंतरही कारवाई होत नसल्याने पुररेषेत अतिक्रमणधारक बिनधास्त झाले आहेत.

### ओढे-नाल्यांवरील बांधकामे काढणार

महापालिका हद्दीतील नैसर्गिक ओढे, नाल्यांवर अतिक्रमण झाले आहे. काही बिल्डरांनी नाले बुजवून कमी व्यासाच्या वाहिन्या टाकल्या आहेत. त्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होऊन रस्त्यावर आणि सखल भागात पाणी साचून राहत आहे. कमी वेळेत जास्त पाऊस झाल्याने पूरसदृशस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे महापालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रत्येकी एक ओढा व नाल्यावरील अतिक्रमण व बांधकामे काढण्यात येणार आहेत. त्याचेही सर्व्हेक्षण सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# गणेशमूर्ती विक्रेत्यांना स्टॉल परवान्यासाठी यंदाही धावाधाव

## रस्त्यांवर विनापरवाना स्टॉल उभारणाऱ्या 226 जणांना नोटीस : विक्रेत्यांना पालिकेच्या एक खिडकी योजनेची माहिती मिळेना

**पुणे | प्रतिनिधी**

गणेश मूर्ती विक्रेत्यांना स्टॉल परवाने देण्यासाठी पुणे महापालिका दरवर्षी जो घोळ घालते तोच घोळ यावर्षीही घातला जात आहे. नेहमीप्रमाणे या वर्षीही परवाना घेण्यासाठी धावा करण्याची वेळ आली आहे. दरम्यान, पालिकेच्या ठरलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र स्टॉल उभारल्याबद्दल २२६ जणांना नोटीस दिली आहे.

महापालिकेने या वर्षी शहरातील सर्व गणेश मंडळांची तसेच विविध संघटनांची ७ ऑगस्ट रोजी बैठक घेतली होती. बैठक संपताच मूर्ती विक्रेत्यांना परवानगी देण्यासाठी एक खिडकी योजना राबविण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिले होते. तसेच या परवानग्या ३१ ऑगस्टपर्यंत देण्यात येतील असेही सांगितले होते. मात्र, अनेक मूर्ती विक्रेत्यांना एक खिडकी योजनेची माहितीच मिळत नसल्याने परवाना घेण्यासाठी धावा करण्याची वेळ आली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही उत्सव सुरू झाल्यानंतरच परवाना मिळणार असल्याचे सध्याचे चित्र आहे.



ठरवून दिलेल्या जागेशिवाय इतर ठिकाणी गणेश मूर्ती विक्रीचे स्टॉल उभारल्याप्रकरणी २२६ स्टॉलधारकांना महापालिकेने नोटीस बजावली आहे. दुसरीकडे एक खिडकी योजना राबविण्यास उदासीनता दाखविली जात आहे. स्टॉलधारकाने एकदा अर्ज दाखल केली की त्याला इतर ठिकाणी परवानगी घेण्यासाठी फिरण्याची आवश्यकता नाही. स्टॉलधारकाने संबंधित पोलीस ठाण्यात जाऊन ना हरकत प्रमाणपत्र आणावयाचे आहे. ते क्षेत्रीय कार्यालयात दिल्यानंतर पालिकेकडून परवानगी दिली जाते, अशी प्रक्रिया साधारणपणे आहे. अवघ्या दोन दिवसांवर उत्सव आला असून परवाने नाहीत. दुसरीकडे परवाना नसेल तर नोटीस मिळत आहे. त्यामुळे करायचे तरी काय या संकटात स्टॉलधारक सापडले आहेत. त्यामुळे पालिकेने यात लक्ष घालून स्टॉलधारकांना दिलासा द्यावा अशी मागणी केली आहे.

शहरात दरवर्षी गणेशोत्सवामध्ये सहा लाखांपेक्षा अधिक गणेश मूर्तींची विक्री होते. यामध्ये घरात बसविण्यात येणाऱ्या मूर्त्यांची संख्या अधिक असतात. त्यांची रस्त्यांच्या कडेला स्टॉल उभारून विक्री केली जाते. यामुळे वाहतुकीला अडथळा होऊन वाहतूक कोंडी होते. त्यामुळे प्रशासनाने रस्त्याच्या कडेला गणेश मूर्ती विक्रीचे स्टॉल उभारण्यास परवानगी नाकारण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यानुसार शाळा, रहदारी कमी असलेली ठिकाणी किंवा मोकळ्या जागांवर २९ ठिकाणे भाडेतत्त्वावर उपलब्ध करून दिली आहेत. या ठिकाणी ५२६ गाळ्यांना परवानगी देण्यात आली आहे. मात्र, महापालिकेची परवानगी न घेता ठरलेली ठिकाणे सोडून इतरत्र मूर्ती विक्रीचे स्टॉल उभारणाऱ्या २२६ व्यावसायिकांना पालिकेच्या अतिक्रमण विभागाने नोटीस बजावली आहे.

शहरामध्ये गणेशोत्सवाच्या तयारी जोरात सुरू असून मंडळांचे मंडप उभारण्याचे काम पूर्ण होत आले आहे. महापालिका शनिवारवाडा, कुंभारवाडा, तसेच मोकळ्या जागांवर विक्री स्टॉलला परवानगी देते. यंदा पदपथावरही स्टॉल उभारल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या वर्षी प्रशासनाच्या उदासीन कारभारामुळे गणेश उत्सव सुरू झाल्यानंतर मूर्ती विक्रेत्यांना परवानगी दिली गेली. याबाबत विक्रेत्या संघाने बैठकीत तक्रारही केली होती. तसेच यंदा ज्या प्रमाणे लवकर बैठक घेतली त्याप्रमाणे लवकर परवानगी देण्याची मागणी केली होती. त्याची तत्काळ दखल घेत आयुक्तांनी आदेश देऊन एक खिडकी योजना राबवून परवानग्या द्या, असे जाहीर केले होते. मात्र, अद्याप अनेकांना परवानग्या मिळालेल्या नाहीत.

### पालिका शाडूच्या मूर्तींची करणार विक्री

» पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे महापालिकेने आवाहन केले आहे. त्यापुढे आणखी एक पाऊल महापालिकेने पुढे टाकत ‘मूर्ती आमची, किंमत तुमची’ हा उपक्रम राबविण्याचा निर्णय जाहीर केला आहे. पीओपीची मूर्ती न वापरता नागरिकांनी शाडू मातीची मूर्ती खरेदी करण्यास प्राधान्य द्यावे या उद्देशाने पर्यावरण विभाग व लिबर्टी अर्थवेअर आर्ट्या मदतीने फक्त शाडू मातीची मूर्ती “ मूर्ती आमची , किंमत तुमची” हा उपक्रम हाती घेतला आहे.

“ महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून प्रत्येक पोलीस ठाण्यात साहाय्यक अतिक्रमण निरीक्षक देण्यात आला आहे. स्टॉलधारकांना पोलिसांचे ना हरकत प्रमाणपत्र मिळाले की तत्काळ पालिकेचा परवाना दिला जातो. एक खिडकी योजना सुरूच आहे. कोणालाही त्रास होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. आतापर्यंत शहरात १९० स्टॉलधारकांना परवाना दिले आहे. बेकायदा स्टॉल धारकांना नोटिसा देण्यात आल्या असून त्यांना स्टॉल काढून घेण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर मात्र, कारवाई केली जाईल.

**- सोमनाथ बनकर, अतिक्रमण विभाग प्रमुख, पुणे महापालिका.**

# जास्त दराच्या निविदाधारकांना काम देण्याचा घाट

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या पश्चिम रिंग रोडचा खर्च जाणार 40 हजार कोटींपर्यंत

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) हाती घेतलेल्या पश्चिम रिंग रोडची निविदा इस्टिमेटपेक्षा वीस ते पंचवीस टक्के जादा दराने आल्या आहेत. या निविदांची छाननी केली असता, त्या जादा दराने आल्या असूनही या कंपन्यांना काम देण्याच्या हालचाली शासन दरबारी सुरू झाल्या आहेत.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी महामंडळाकडून रिंगरोडचे काम हाती घेण्यात आले आहे. वाढीव दराने आलेल्या निविदा स्वीकारल्यास



भूसंपादन आणि रस्ता विकसित करणे, यांचा खर्च जवळपास चाळीस हजार कोटी रुपयांपर्यंत जात आहे.

त्यामुळे कंपन्यांनी वाढीव दराने निविदा भरण्यामागची कारणे तपासण्याचा निर्णय महामंडळाने मध्यंतरी घेतला होता. त्यासाठी मुंबई येथील दोन त्रयस्थ कंपन्यांकडून या निविदांची तपासणी करून घेण्यात आली.

या दोन्ही कंपन्यांनी नुकतेच महामंडळाला आपले अहवाल सादर केले. त्यामध्ये एका संस्थेने इस्टिमेटपेक्षा जादा दराने या निविदा आल्याचे अहवालात मान्य केले; परंतु ‘त्या’ कंपन्यांशी तडजोड करून इस्टिमेट रकमेपेक्षा वीस ते पंचवीस टक्के जादा दराने काम देण्यास हरकत नाही, अशी शिफारस अहवालात केली होती.

तर दुसऱ्या संस्थेने इस्टिमेट रकमेपेक्षा जास्तीत जास्त पाच ते सात टक्के जादा दराने कंपन्यांना काम द्यावे, अशी शिफारस अहवालात केली होती. त्यामुळे महामंडळापुढे पुन्हा अडचण निर्माण झाली.

दोन दिवसांपूर्वी महामंडळाच्या संचालक मंडळाची बैठक झाली. या बैठकीत दुसऱ्या संस्थेचा अहवाल बाजूला ठेवून देत पहिल्या संस्थेच्या शिफारशीला मान्यता दिली, तसेच तो अहवाल अंतिम मान्यतेसाठी राज्य सरकारच्या पायाभूत समितीकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार तो नुकताच पाठविल्याचे एमएसआरडीसीतील अधिकाऱ्यांनी सांगितले.